# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०१७

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : मा.सभापती यांचा प्रस्ताव -**

**"भारतीय न्यायाधीश श्री.दलवीर भंडारी यांची हेग येथील संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशपदी फेरनिवड झाल्याबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव."**

**तीन : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहिर करण्यात येईल.**

**चार : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(१) मुख्यमंत्री : (क)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २२ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २४ - पंढरपूर मंदिर (सुधारणा) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २५ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) महसूल मंत्री : (क)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २७ - महाराष्ट्र

जमीन महसूल संहिता, (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **ग्रामविकास मंत्री** : **(क)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक १८ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक १९ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २१ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **पणन मंत्री** : **(क)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक १७ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २० - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

**पाच : कागदपत्र सभागृहासमोर ठेवणे -**

**वित्त व नियोजन मंत्री** : "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, २०११ च्या नियम ७ अन्वये, वार्षिक योजना २०१७-२०१८ मधील प्रदेशनिहाय नियतवाटपाबाबतचे मा.राज्यपाल यांचे दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजीचे अतिरिक्त निदेश" सभागृहासमोर ठेवतील.

**सहा : सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.**

**सात : सन २०१२-२०१३ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सादर करणे.**

**आठ : महिलांचे हक्क व कल्याण समितीचे नामाभिधान व कार्यकक्षा सुधारण्याबाबतचा प्रस्ताव.**

**नऊ : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास).**

**दहा : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे**, सर्वश्री.धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर येथील मिहान प्रकल्पात आतापर्यंत केवळ ३० टक्के कंपन्या सुरु असणे, या ठिकाणी ७१ कंपन्यांकरिता जागा असून त्यातील २१ कंपन्या सध्या कार्यरत असणे, पाच कंपन्यांचे निर्माण कार्य सुरु असून ४५ कंपन्यांची काम सुरु करण्याची कार्यवाही सुरु असणे, या प्रकल्पात इन्फोसिस टीसीएस, सत्यम, एचसीएल, बोईग, टाटा एरोनॉटीकल्स लिमिटेड, शापुरजी पालोनजी, विप्रो, डीएफएल, अंबुजा रियल्टी, ताजसॅट इंडस्ट्रीज, मॅक्सस्पेस, एल ॲन्ड टी, इंटरनॅशनल कोलॅबरेटीव्ह एअरोस्पेपडेव्ह अंतर्गत कॅनस कंपनी, पतंजली यासारख्या कंपन्यांनी गुंतवणूक करण्यासाठी राज्य सरकार सोबत सहयोग करार करणे, सहयोग करारानुसार सुमारे १००० एकर जमीन या कंपन्यांना देणे, सदर प्रकल्पाकरिता दहेगाव, तेल्हारा, कलकुही, खापरी आणि शिवणगाव येथील जमिनी संपादित करण्यात येणे, सदरच्या जमिनी संपादित करतेवेळी जमिनीचा योग्य मोबदला, गावांचे योग्य प्रकारे पुनर्वसन, तसेच स्थानिकांना नोकऱ्या देण्याचे आश्वासन देण्यात येणे, या प्रकल्पग्रस्तांना अजूनही एकाही कंपनीमध्ये नोकरीत सामावून न घेणे, तसेच या प्रकल्पग्रस्तांसाठी महानिर्मितीतर्फे राबविण्यात येणारी प्रशिक्षण योजना मिहानमध्ये राबवण्याचे निर्देश पालकमंत्री यांनी मिहानचे प्रबंध संचालक यांना माहे मे, २०१७ मध्ये देऊनही अद्यापपर्यंत या संदर्भात कोणतीच कार्यवाही न होणे, या प्रकल्पाकरिता ४ गावांपैकी ३ गावांचे पुनर्वसन झालेले असणे, परंतु अद्यापपर्यंत आवश्यक त्या मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन न देणे, पुनर्वसन परिसरात आठवडी बाजाराची सोय नसणे, कचऱ्याची समस्या, आरोग्याच्या सुविधा, शाळेची व्यवस्था अशा अनेक मूलभूत सोयी नसल्याने तेथील रहिवाशी त्रस्त असणे, पुनर्वसनापूर्वी ३ ते ४ वर्षे पाणीपट्टी माफ करण्यात येईल असे सांगण्यात येऊनही मीटर लावताच पाणीपट्टी वसूल केली जाणे, जी ४०० कुटुंबे शासकीय जागेवर आहेत त्यांच्यासाठी माफक दरात घराची योजना तयार करण्याच्या सूचना पालकमंत्री यांनी देऊनही अद्यापपर्यंत या संदर्भात कोणतीच कार्यवाही न करणे, त्याचप्रमाणे दहेगाव, तेल्हारा, कलकुही या गावासाठी पुनर्वसनासाठी जे नियम लावले ते नियम खापरी गावाकरिता लावण्यात न

येणे, उपरोक्त गावांतील शेतकरी कुटुंबातील प्रत्येक प्रौढ मुलाला तसेच शेतकऱ्यांनाही ३००० चौ.फूटाचा भूखंड देण्यात येणे, गावातील झोपडपट्टीधारकांना १५०० चौ.फूटाचा भूखंड देण्यात येणे, परंतु खापरी गावातील प्रकल्पग्रस्तांना मात्र एका कुटुंबात वडील व तीन भावंडे असतील तर दोघांनाच भूखंड देऊन तिसऱ्याला अपात्र ठरविणे, नियमापेक्षा कमी भूखंड देणे असे प्रकार घडत असणे, आतापर्यतचे पुनर्वसन राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००७ नुसार होत असतांना कायदयानुसार १८ वर्षावरील अविवाहित मुले असल्यास व त्यांच्या नावे असलेली वेगळी शेतजमीन किंवा घर संपादित झाले असल्यास त्यांना भूखंड व इतर पुनर्वसनाचे काम देण्यात यावे असा कायदा असतांना या कायद्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष करुन खापरीवासियांवर अन्याय करणे, प्रकल्पग्रस्त २६०० कुटुंबियांच्या वारसांना मिहान प्रकल्पात नोकरी न मिळणे, आतापर्यंत केवळ १० हजार युवकांनाच रोजगार मिळणे, बेरोजगार युवकांची त्यामुळे झालेली निराशा, प्रकल्प सुरू न करणाऱ्या कंपन्यावर कारवाई करणे, जमीन परत घेण्याची होत असलेली मागणी, एकूणच मिहान प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत वारंवार मा. मुख्यमंत्री व संबधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा होऊनही अद्यापही या समस्या दूर न होणे, परिणामी या प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाच्या उदासिनतेबाबत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **सर्वश्री. संजय दत्त,** शरद रणपिसे, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर येथील मिहानमधील रामदेव बाबा यांच्या फूड पार्कसाठी ६०० कोटी रुपयांची जमीन अल्पदरात देण्यात येणे, एक एकर जमिनीचे दर १०० कोटी असताना रामदेव बाबा यांना २५ लाख रुपये प्रति एकर या दराने जमीन दिली ही बाब माहिती अधिकारावरील सुनावणी दरम्यान माहिती देणाऱ्या, कागदपत्रे उपलब्ध करणाऱ्या समीर गोखले आणि अतुल ठाकरे या दोन अधिकाऱ्यांची बदली केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ च्यासुमारास उघडकीस येणे, माहिती अधिकार कायद्याचे पालन करत असलेल्या अधिकाऱ्यांना अशाप्रकारे दंडित केल्याप्रकरणी माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी विरोध दर्शविला असणे, रामदेव बाबा यांच्या फुड पार्कसाठी अल्पदरात दिलेल्या जमिनीवर सदरील प्रकल्प अजूनही उभा राहिला नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या सुमारास निदर्शनास येणे, नागपुर येथील केंद्र सरकारच्या मालकीच्या मिहान प्रकल्पाअंतर्गत १००० एकर जागा कवडीमोल भावाने रामदेव बाबांच्या पतंजली संस्थेला देण्यात येणे, गेल्या आठ महिन्यांत रामदेव बाबांच्या पतंजली संस्थेने अद्याप कसलाही प्रकल्प सुरु केलेला नसणे, मिहान

उद्योग प्रकल्पाशी झालेल्या करारात एक वर्षाच्या आत प्रकल्पात आयुर्वेदीक औषध उत्पादन सुरु होईल असा प्रत्यक्षात करार करुन रामदेव बाबांना सर्व सवलती देण्यात येणे, मात्र उद्योग सुरु होण्याची कोणतीही लक्षणे दिसुन येत नसणे, रामदेव बाबांना ही जमीन हस्तांतर करण्याच्या भव्य समारंभाच्या वेळी विदर्भातील ५००० तरुणांना रोजगाराची संधी दिली जाईल असे प्रत्यक्षात सांगण्यात येणे, पण आता १००० एकर जागा पडून असून प्रकल्पाला कसलीही सुरुवात अद्याप नसल्याने विदर्भातील बेरोजगारांची फसवणूक करण्यात आल्याने विदर्भीयवार्यींमध्ये याबाबत तीव्र नाराजी असणे, रामदेवबाबा यांना कवडीमोल भावाने देण्यात आलेली १००० एकर जागा परत घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. प्रविण दरेकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"उल्हासनगर पालिकेतील मागासवर्गीय भरतीत मोठा घोटाळा झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या सुमारास निदर्शनास येणे, या भरतीत महिला अधिकाऱ्यांनी बोगस प्रमाणपत्रे सादर करून नोकरी मिळविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, तर कनिष्ठ लिपिक पदावरुन थेट सहायक आयुक्त पदावर पदोन्नती देण्यात येणे, त्यांच्याच काळात मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामे झाल्याचेही दिसून येणे, या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करुन संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. जयंत पाटील,** बाळाराम पाटील, सुनिल तटकरे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, जयवंतराव जाधव **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुर्नवसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"अरबी समुद्रात उसळलेले ओखी चक्रीवादळ रायगड समुद्र किनाऱ्यावर येऊन धडकल्याने राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात दिनांक ४ डिसेंबर २०१७ रोजी अवकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळणे, विशेषत: रायगड जिल्ह्यात आंबा, काजूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होणे, परंतु अवकाळी पडलेल्या पावसामुळे आंबा तसेच काजूवरील मोहर गळून पडल्याने यावर्षी आंबा व काजू उत्पादनात घट होणार असल्याने बागायतदारांचे मोठे नुकसान होणे, तसेच सुपारीची साठवणूक करणाऱ्या सहकारी संस्थांची सुपारी भिजल्यामुळे त्यांनाही आर्थिक फटका बसणे, अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) खंडाळे, वाडगाव, सहाण, उसर, वावे तसेच वाघ्रण, परहूरपाडा आदी ठिकाणी पांढऱ्या कांद्याचे मोठया प्रमाणात

उत्पादन घेण्यात येत असून, अवकाळी पडलेल्या पावसामुळे येथील कांद्याची रोपे मोडून पडणे व शेतात पाणी साचले असल्याने त्याचा परिणाम कांदा उत्पादनावर होणे, पावटा, तूर व इतर कडधान्य पीकांचे बऱ्याच प्रमाणात नुकसान होणे, तसेच अनेक ठिकाणी मळणीची कामे अजूनही प्रलंबित असल्यामुळे पावसामुळे भात भिजल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणे, पावसामुळे पेंढयांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांसमोर गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणे, देवगड तालुक्यातील पडवणे, मिळबाव, सांबळडेग येथील रापण कंपनीच्या जाळीचे झालेले नुकसान, तर नाशिकसह निफाड, दिंडोरी, चांदवड, सटाणा या तालुक्यातील अनेक भागात मुसळधार पावसामुळे द्राक्षबागा, कांदा, डाळींब आणि गहू पिकाचे झालेले मोठ्या प्रमाणात नुकसान तसेच पुणे जिल्ह्यातील अनेक भागांत मुसळधार पाऊस पडल्याने त्यामुळे रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पेरलेल्या पिकांचे झालेले प्रचंड नुकसान, रायगड जिल्हयात काही ठिकाणी मच्छिमारांच्या बोटी बुडणे व बोटींचे नुकसानही होणे शासनाकडून या नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. अमरसिंह पंडित,** सतिश चव्हाण, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, जयवंतराव जाधव, हेमंत टकले, ॲड. निरंजन डावखरे, श्री. जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. रामराव वडकुते, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, ॲड. जयदेव गायकवाड, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. ख्वाजा बेग, विक्रम काळे, प्रकाश गजभिये, विनायक मेटे, जोगेन्द्र कवाडे, हरिसिंग राठोड, संजय दत्त, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सुमारे ४० लाख हेक्टर क्षेत्रात कपाशीची लागवड करण्यात येणे, या पैकी मराठवाडा विभागात १५.९२ लाख हेक्टर क्षेत्रात बी.टी.कपाशीची लागवड होणे, बी.टी. बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यापैकी सुमारे १८ कंपन्यांनी बोगस, बनावट बियाणे विक्री केल्यामुळे राज्यभरात कपाशीवर शेंदरी बोंड आळीसह इतर रोगांचा मोठा प्रादुर्भाव होणे, त्यामुळे राज्यात विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात कपाशीच्या उत्पन्नात कमालीची घट होणे, बियाणे उत्पादक कंपन्यांनी बी.टी. बियाणांमध्ये बी.जी.-२ तंत्रज्ञान असल्यामुळे ११० दिवस व त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी हे बियाणे शेंदरी बोंड आळी आणि इतर रोगांपासून पिकांचे संरक्षण करणार असल्याचा दावा करणे, कंपनीच्या या दाव्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकचे पैसे देऊन ही बियाणे खरेदी करणे,मात्र बियाणे उत्पादक कंपन्यांनी शेतकऱ्यांची मोठी फसवणूक करणे, कापूस बियाणे कायदा, २००९ मध्ये नुकसान भरपाईची तरतूद असतानाही शेतकऱ्यांना अद्याप कोणतीही भरपाई न मिळणे, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र,

नागपूर येथील शास्त्रज्ञ यांनी बी.टी. तंत्रज्ञान आता बोंड आळी व इतर रोगांना प्रतिकार करत नसल्याने हे बियाणे संकरीत म्हणून विक्री करावे असे शासनास कळविलेले असणे, मात्र तरीही शासनाने या बाबत कोणतीही कार्यवाही मुदतीत न केल्याने शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान होणे, बोंड आळीच्या संकटाने कापूस उत्पादक शेतकरी उध्वस्त होणे, नुकसानग्रस्त काही शेतकऱ्यांनी कृषी कार्यालयासमोर अंगावर रॉकेल ओतून आत्महत्येचा प्रयत्न करणे, अनेक शेतकऱ्यांनी आर्थिक नुकसानीमुळे नैराश्यापोटी आत्महत्या करणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने सरसकट नुकसान भरपाई देण्याच्या मागणीसाठी राज्यभर तीव्र आंदोलने होणे, मात्र अद्याप कोणतीही आर्थिक मदत न केल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरणे, या गंभीर प्रकरणात बियाणे उत्पादक कंपनी विरोधात कार्यवाही करून शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**अकरा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख** - **(असल्यास).**

# - मध्यंतर -

**बारा : शासकीय विधेयके -**

**(क) ग्रामविकास मंत्री यांचा प्रस्ताव (म.वि.प. नियम १४९ अन्वये) -**

"महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले **सन २०१७ चे वि.स.वि.क्रमांक ५५ — महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७** मागे घेण्यास अनुमती द्यावी."

---------------------------------------------------------------------------

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७"**

---------------------------------------------------------------------------

**तेरा : प्रा.अनिल सोले,** ॲड. अनिल परब, श्री.गिरीश व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. परिणय फुके, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री. तानाजी सावंत, मितेश भांगडिया, गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, विनायक मेटे, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"राज्यात विदर्भातील सर्व जिल्हे व मराठवाड्यात पडलेला कमी पाऊस, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेण्याची आवश्यकता, या भागातील सिंचनाचा अनुशेष वेगाने पूर्ण करण्याची गरज, विदर्भातील अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या सहाय्याने तयार केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना

तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, बेंबळा प्रकल्पाच्या कामाला देण्यात आलेली गती, माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी भूमीपुजन केलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या सर्व परवानग्या प्राप्त करुन प्रकल्पाची किंमत केंद्र शासनाने निश्चित करण्यासाठी झालेली कार्यवाही, अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कापुस, तूर व हरभरा इ.पिकांचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांवर येणे, डुक्कर, हत्ती इ. जनावारांमुळे होणारे शेतीचे नुकसान रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, पाणंद रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण प्राधान्याने करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्राउद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय इ. शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना कार्यान्वित करणे, शेतमालाला किमान हमीभावाप्रमाणे दर मिळण्याची व जेथे कमी भाव असेल तेथे अनुदान देण्याची गरज, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेली गती, ही योजना अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथिल करण्याची आवश्यकता, कृषीपंपांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सोलर फिडरची योजना कार्यान्वित करणे व वीजपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जांचा डिसेंबर, २०१७ पर्यंत शीघ्रगतीने निपटारा करण्याची आवश्यकता, राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी नविन उपकेंद्र, रोहित्र व पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, सिंचन अनुशेषाच्या भागात अधिक अनुदान देण्याची गरज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये शासनाने ४ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असणे, त्यामुहे ५ हजार गावांमध्ये शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे व शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली असणे, आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांपेक्षा एकट्या मुंबईला अधिक कर्जमाफी देण्याचे पूर्वीच्या शासनाने धोरण असताना अवघ्या ५ महिन्यात संपूर्ण राज्यभरात कर्जमाफीची प्रक्रिया गतीने पूर्णत्वाकडे येणे, कृषी खात्यातील रिक्त पदे तातडीने भरणे व आशाच्या धर्तीवर शेतकरी मित्र नेमण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने नदीजोड प्रकल्प राज्यात कार्यान्वित करण्याची आवश्यकता, एमआरईजीएस मध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरी करण्याची आवश्यकता, कृषीमालावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी विशेष आर्थिक क्षेत्र उभे करण्याची आवश्यकता, विदर्भाच्या समग्र विकासाला वेग देण्याची आवश्यकता, अमरावती भागात उभारण्यात येणाऱ्या टेक्सटाईल पार्कला अधिक गती देण्याची आवश्यकता, मोर्शीत संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरू करणे व संत्रा धोरण जाहिर करणे, मिहानमध्ये मोठ्या संख्येने येत असलेली गुंतवणूक, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना यशस्वीपणे व पारदर्शकरित्या राबविल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्याकरिता पात्र होणे, मागील ३ वर्षात शासनाने शेतीमधील गुंतवणूक वाढविल्यामुळे शेतीचा विकास दर सतत नकारात्मक राहत असताना हा दर प्रथमच + १२.५ टक्क्यांवर नेण्यास शासनास आलेले यश, राज्यातील शेतकरी कायमस्वरुपी स्वबळावर उभा राहू शकेल व त्याला

भविष्यात कर्ज घेण्याची पाळी येणार नाही या दृष्टीने योजना आखून त्या तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**चौदा : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) प्रा.अनिल सोले, वि.प.स.**

"**नागपूर विभागातील महाविद्यालयातील विद्यार्थी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत**" या विषयावरील **प्रा.अनिल सोले व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१२४७ ला दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.ख्वाजा बेग, वि.प.स.**

"**आर्णी ते अंतरगाव (जि.यवतमाळ) जोड रस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**" या विषयावरील **श्री.ख्वाजा बेग व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३२१११ ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ११ डिसेंबर, २०१७.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.